**नि. दि. दा. क्र. ४४/२०२१**

## निशाणी क्रमांक ०१ खाली आदेश

**(दिनांक ०७/०४/२०२६)**

सदर प्रकरण १६.१५ वाजता पुकारले असता वादी क्र. ०१ ते ०५ न्यायालयात हजर. प्रतिवादी क्र. १५ करिता मा. विधीज्ञ जे. एम. खान न्यायालयात हजर. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. १५ ने नि. क्र. १९ वर उलटदावा दाखल केलेला आहे. वादीने नि.क्र. ०५ वर व प्रतिवादीने नि. क्र. ११ वर अंतरिम मनाई हुकुमासाठी अर्ज दाखल केलेले आहेत. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. ०१ मयत असून सदर प्रकरण त्याबाबत वादीने स्टेप्स घेण्यासाठी आहे.

२. प्रकरण पुकारले असता वादी क्र. ०२ यांनी मला न्यायालयाला सांगायचे आहे असे कथन केले. त्यांना परवानगी दिली असता त्यांनी असे कथन केले की, मागिल नऊ महिन्यांपुर्वी वकिलांनी त्यांची वकिलपत्रावर सही घेतलेली आहे. त्यांचा दावा पुढे चालत नाही. त्यांना तुम्ही स्वतः प्रकरण चालवणार कि वकिलसाहेब चालवणार असे विचारले असता त्या विटनेस बॉक्समध्ये आल्या व त्यांच्या हातात असलेले कागदपत्र न्यायालयास दाखवून 'आमचे कागदपत्रे बघा' असे कथन केले. न्यायालयात बोलताना त्यांचा आवाज अत्यंत मोठा होता. त्यांना तुमचा दावा प्रतिवादी क्र. ०१ विरुध्दच्या स्टेप्स घेण्याकरिता आहे असे निदर्शनास आणूनदेखील त्या ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हत्या. त्यांना तुमचे वर्तन रेकॉर्ड केले जाईल असे सांगितले असता 'मी घाबरत नाही,' असे त्यांनी उत्तर दिले. अशा परिस्थितीत वादी क्र. ०२ चे वरील वर्तनाची नोंद घेण्यात आली. वादी क्र. ०२ ला सक्त ताकिद देण्यात येते की, वादी क्र. ०२ ने यापुढे न्यायालयात त्यांचे मा. विधीज्ञ हजर ठेवावे अथवा स्वतः

व्यक्तीशः न्यायालयात हजर राहिल्यास त्यांचे न्यायालयासमोरील वर्तन व्यवस्थित असावे. वादी क्र. ०२ ने नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.04.07 17:17:03 +0530

दिनांकः– ०७/०४/२०२६.

**( पी.डी. देवरे )**

सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,

कारंजा (लाड)